Printed from

महाराष्ट्र टाइम्स The Maharashtra Times -Breaking news, views. reviews, cricket from across India

# समर्थांचे 'कम्युनिकेशन'

10 Jun 2011, 0147 hrs IST

SMS NEWS to 58888 for latest updates

- डॉ. सुधीर निरगुडकर

मानवी जीवनात सर्वात जास्त महत्त्व कशाला असेल तर ते आहे संवादाला. जिथे जिथे एकापेक्षा अधिक व्यक्तींचा संबंध येतो तिथे तिथे संवाद आवश्यक असतो. साहजिकच राजकारण, उद्योग-व्यवसाय, समाज-कारण यांसारख्या संघटित कार्यपद्धतीवर अवलंबून असलेल्या क्षेत्रांमध्ये संवादाला विलक्षण महत्त्व आहे. व्यवस्थापक किंवा टीम लीडर याला हाताखालच्या अनेकांकडून काम करवून घ्यायचे असते. आळशी लोकांना कार्यप्रवृत्त करायचे असते, चांगले काम करणाऱ्यांना प्रोत्साहन द्यायचे असते, निराश झालेल्यांना धीर द्यायचा असतो, संपूर्ण टीमचे मोराल टिकवून आस्थापनाचे उद्दिष्ट गाठायचे असते. साहजिकच उद्योग-व्यवसायात संवादाला अनन्य-साधारण महत्त्व आहे. त्यामुळे व्यवस्थापकाकडे प्रभावी वक्तृत्व, समोरच्याचे म्हणणे ऐकण्याची तयारी, सोपी आणि अर्थवाही लिखित भाषा हे गुण असतील तर त्याची नेतृत्वशैली अधिकच खुलते. संवादाचे हे महत्त्व समर्थ रामदासस्वामी पूर्णपणे जाणून होते. म्हणूनच त्यांनी आपल्या दासबोध आणि मनाचे श्लोक यांतून नेतृत्वशैली कशी विकसित करावी हे सांगतानाच प्रभावी संवाद कसा साधावा याच्या टिप्सही दिल्या आहेत.

जनी वाद वेवाद सोडूनि द्यावा। जनी सूखसंवाद सूखे करावा। जगी तोचि तो शोक संतापहारी। तुटे वाद संवाद तो हीतकारी।। आज कम्युनिकेशनच्या क्षेत्रात क्रांती झालेली आहे. पण केवळ आधुनिक तंत्रज्ञानामुळे संवादाची पातळी सुधारते असा त्यांचाही अनुभव नाही. त्यामुळे मुळात दोन व्यक्तींमधला संवाद सुधारायचा असेल किंवा संवादातून आर्थिक वा सामाजिक फायदा करून घ्यायचा असेल तर संवाद कौशल्ये विकसित करण्यावरच भर दिला पाहिजे.

संवाद परिणामकारक होण्यासाठी हवे असतात ते सुसंवादी कान. बोलणारा कितीही प्रभावीपणे बोलला पण समोरच्याचे त्या बोलण्याकडे पूर्ण लक्षच नसेल तर तो संवाद अर्धवटच राहील. 'श्रवण विचार कळे। तरीच भाग्यश्री प्रगटे बळे।' अशा शब्दांत समर्थांनी श्रवणाचे महत्त्व अधोरेखित केले आहे. स्टीफन कोवे हा आधुनिक मॅनेजमेंट गुरूही संवादात ऐकण्याला महत्त्व देतो. कोवे त्याच्या 'सेव्हन हॅबिट्स ऑफ हायली इफेक्टिव्ह पीपल'मधली एक हॅबिटच या योग्य श्रवणावर खर्ची घालतो. कोवेच्या मते, 'बरेच लोक संवादात समोरच्याचे म्हणणे शांतपणे ऐकून न घेता, ऐकण्याच्या क्रियेवर स्वत:च्या मनात येणारे विचार लादतात आणि समोरच्याचे म्हणणे नीट न कळल्याने संवाद अपूर्ण राहतो. समोरच्याने नीट ऐकले नाही तर जो अपूर्ण संवाद होतो त्यातून कार्यनाश कसा होतो याचा खचित अनुभव मी घेतला आहे. आमच्या तुळापूरच्या दाक्षबागेत देखभाल करण्यासाठी मी एकाची नेमणूक केली होती. सुरुवातीला त्याने नीट काम केले; पण नंतर मी सांगितलेली कामे तो त्याला हवी तशी, हवी तेव्हा करू लागला. औषधाची फवारणी दिवसांतून एकदा कर असे सांगितले तर दिवसांतून तीनदा करायचा. विचारले तर तुम्ही असेच सांगितले होते असे म्हणायचा. त्याच्या या वागण्याने माझ्या दाक्षबागेचे प्रचंड नुकसान झालेच व त्यासाठी त्याला मला काढून टाकावे लागले.

समर्थ रामदास म्हणतात, 'सकळांमध्ये विशेष श्रवण। श्रवणाहुनी थोर मनन। मनने होय समाधान। बहुत जनांचे।। धूर्तपणे सकळ जाणावे। अंतरी अंतर बाणावे। समजल्याविण सिणावे। कामयासी।। अर्थात समर्थांना हेच सांगायचे आहे की, श्रवण व मननाच्या साहाय्याने दुसऱ्याचे म्हणणे नीट समजून घेतले पाहिजे. दुसऱ्याच्या मनीचे जाणून संवाद साधण्यालाच कोवे 'प्रिन्सिपल ऑफ एंपथेटिक कम्युनिकेशन' म्हणतो.

Network Access Message: The page

Tweet या बातमीला ट्विट करा

**या बातमीवर तुमचं मत मांडण्यासाठी** इथे क्लिक करा.

इतर बातम्यांचे व्हिडिओ पाहण्यासाठी क्लिक करा

Powered by Indiatimes

About Us | Advertise with Us | Terms of Use | Privacy Policy | Feedback | Sitemap

Copyright © 2011 Bennett Coleman & Co. Ltd. All rights reserved. For reprint rights: Times Syndication Service

This site is best viewed with Internet Explorer 6.0 or higher Firefox 2.0 or higher at a minimum screen resolution of 1024x768